▶ वर्ष-३
■ अंक-८

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!



आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २५ सप्टेंबर २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com

## ‘सरकार आपल्या दारी’ सारखे फोल इव्हेंट करायचे आणि दुसरीकडे सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजांचे खाजगीकरण करायचे हे कोणत्या नीती मध्ये बसते?

# इव्हेंट संस्कृती बंद करा निलेश चव्हाण यांची सरकारच्या धोरणावर टीका



**ठाणे:- सर्वसामान्यांचे सरकार म्हणायचं, सरकार आपल्या दारी सारखे फोल इव्हेंट करायचे आणि दुसरीकडे सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजांचे खाजगीकरण करायचे, हे कोणत्या नीती मध्ये बसते, असा खरमरीत सवाल सामाजिक कार्यकर्ते आणि भाजपचे माजी ठाणे उपाध्यक्ष निलेश चव्हाण यांनी सरकारला विचारला आहे.**

मनसेचे ठाणे शहर अध्यक्ष राहिलेले व त्यानंतर मागील पाच वर्ष भाजपचे ठाणे शहर सरचिटणीस व उपाध्यक्ष म्हणून काम पाहिलेले निलेश चव्हाण सध्या सोशल मीडियावर चांगलेच सक्रिय असतात.

ठाणे शहराच्या बाबतीत अनेक समस्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून वाचा फोडून शासनाच्या चुका निदर्शनात आणून देण्याचे काम निलेश चव्हाण करताना दिसतात. अलीकडे सरकारच्या चुकीच्या धोरणावर रोखठोक भाष्य करताना निलेश चव्हाण यांनी भाजपलाही अनेक मुद्द्यांवरून घरचा आहेर दिला आहे.

नुकतेच त्यांनी शासकीय नोकऱ्यांच्या कंत्राटीकरणावर व प्राथमिक शाळांना प्रायव्हेट कंपन्यांच्या हवाली करण्याच्या निर्णयावर थेट भाष्य करत सरकारला प्रश्न विचारले आहेत. याबाबतचे ट्विट त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केले असून या ट्विटमध्ये त्यांनी सरकारच्या नोकऱ्यांबाबत खाजगीकरणाच्या धोरणावर टीका केली आहे. नोकऱ्या आणि प्राथमिक शाळांचे खाजगीकरण करण्यापेक्षा सरकारच का कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने चालवायला देत नाही, असा सवालच निलेश चव्हाण यांनी केला आहे.

इव्हेंट संस्कृती मधून बाहेर या, काहीतरी खरं काम करा, गेटवेल सून... गणपती बाप्पा तुम्हाला सद्-बुद्धी देवो. अशा आशयाचे ट्विट निलेश चव्हाण यांनी केले आहे. सर्वसामान्यांचे सरकार म्हणायचं आणि सरकार आपल्या दारी सारखे फोल इव्हेंट करायचे आणि दुसरीकडे सर्वसामान्यांच्या मूलभूत गरजांचे खाजगीकरण करायचे हे कोणत्या नीतीत बसते ? असा सवाल ही त्यांनी या ट्विटच्या माध्यमातून केला आहे. एकंदरीत युती सरकारच्या भूमिकांवरच त्यांनी प्रश्न उपस्थित करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न या ट्विट मधून केला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३ | पान : २
www.diwanews.com

**सहकार चळवळीचे भविष्य उज्ज्वल केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह**

**मुंबई :** सहकार चळवळीने कालानुरुप स्वतःला बदलणे आवश्यक आहे. देशात रोजगारनिर्मिती सोबतच आर्थिक विकास वाढविण्याची ताकद सहकार क्षेत्रात आहे. केंद्र सरकारही सहकार विद्यापीठाची स्थापना करुन त्या माध्यमातून बँक, दुग्धव्यवसाय, कृषी, विपणन क्षेत्रासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणार आहे. ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे बळकटीकरण करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.

# लुईसवाडीतील 'मालवण तडका'वर ठेवला अस्वच्छ आणि अनारोग्य वातावरणाचा ठपका




**ठाणे: अस्वच्छ व अनारोग्य वातावरणात अन्नपदार्थ तयार करणाऱ्या ठाण्यातील इस्टर्न एक्सप्रेस हायवे, लुईसवाडी येथील हॉटेल सरोवर रेस्टॉरंटअँड बार, (मालवण तडका) ला गुरुवारी ठाणे अन्न व औषध प्रशासन विभागाने व्यवसाय बंद चे निर्देश बजावले आहेत. अशाप्रकारे ठाणे एफडीएने फोडणी लगावली आहे. दरम्यान हॉटेल व्यावसायिकानी जनहित व जन आरोग्याच्या दृष्टीकोनातून हॉटेल व्यवसायासी संबंधीत लागू तरतूदींचे तंतोतंत पालन करावे, असे आवाहनही ठाणे एफडीएचे सह आयुक्त सुरेश देशमुख यांनी केले आहे.**

अन्न व औषध प्रशासन मंत्री बाबा आत्रम व प्रशासनाचे आयुक्त अभिमन्यु काळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार पूर्ण राज्यात हॉटेल तपासणी मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. त्याच पार्श्वभूमीवर गुरुवारी २१ सप्टेंबर २०२३ रोजी मे. हॉटेल सरोवर रेस्टॉरंट अँड बार, (मालवण तडका) ची अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्याखालील नियम २०११ अंतर्गत तपासणी केली असता त्या आस्थापनेकडून जनहित व जन आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाच्या तरतुदीचे पालन होत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले, त्यानुसार अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्या अंतर्गत नियमन २.१.१४ (१) अंतर्गत ''व्यवसाय बंद'' चे निर्देश देण्यात आले. उपरोक्त निर्देशचे पालन करण्यात कसूर केल्यास त्या बाब अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यावसायिकांचा परवाना व नोंदणी) नियमन २०११ चे नियमन २.१.१४ (१) चे उल्लंघन ठरवून ती कलम ५५ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हा ठरतो असे म्हटले आहे. ही कारवाई सहआयुक्त सुरेश देशमुख, ठाणे सहायय्क आयुक्त (अन्न) व्हि. व्हि. वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा आडे व एम पवार यांनी केली.

तपासणीवेळी त्या ठिकाणी अस्वच्छ व अनारोग्य वातावरणात अन्नपदार्थ तयार करीत असल्याचे दिसून आले. पेढीच्या भिंती व छत अस्वच्छ , छत व भिंतीस काही ठिकाणी जाळीजळमटे तसेच माशा, झुरळ, उंदरांचा वावर, ड्रेनेज पाईप मधून पाण्याचा निचरा न होता पाणी साठवून रहाणे, पेस्ट कंट्रोल न केलेले, अन्नपदार्थाची हाताळणी करताना प्रत्यक्ष संबंध येणाऱ्या कामगाराचे ते संसर्गजन्य, त्वचारोग आणि किंवा तत्सम रोग यापासून मुक्त आहेत किंवा कसे याबाबत खात्री खातरजमा होण्यासाठी प्राधिकृत वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून तपासणी केलेली नाही, तसेच पाण्याची तपासणी करून घेतलेली नाही, या बाबी पुढे आल्या आहेत.

# स्वच्छता अभियान सायकल राईडला सायकल प्रेमींचा जोरदार प्रतिसाद

**ठाणे :** स्वच्छतेची शपथ घेत ठाणे मुंबई पनवेल मुरबाड कल्याण डोंबिवली येथील ३४० हून अधिक सायकल प्रेमींनी स्वच्छता अभियान सायकल राईडमध्ये सहभाग नोंदवला. या राईडमध्ये ९ वर्षाच्या मुलांपासून ते ७५ वर्षापर्यंतचे सर्व सायकलप्रेमी सहभागी झाले होते. या राईड दरम्यान घेण्यात आलेल्या स्लोगन स्पर्धेत प्रथम क्रमांक युगा बाचम, द्वितीय क्रमांक सोंडकर, तृतीय क्रमांक आर्यन नाटे तर विशेष पारितोषिक ललित गोलतकर यांनी पटकावला.

केंद्र सरकारच्या इंडियन स्वच्छता लीग () अंतर्गत ठाणे महानगरपालिका आणि आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी ५ आणि १० किमी अंतराची स्वच्छता अभियान या विषयावर ठाणे महापालिका मुख्यालय येथून सायकल राईडचे आयोजन केले होते. यात लहान मुलांचे पालक ही सहभागी झाले होते. यावेळी व्यासपीठावर उपायुक्त शंकर पाटोळे, आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशनचे सेक्रेटरी दीपेश दळवी, संस्कृत शिक्षक दीपक धोंडे, जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, सुप्रसिद्ध सायकलपटू प्रवीणकुमार कुलथे, प्रा. सुनील भुसारा आदी उपस्थित होते.

उपायुक्त शंकर पाटोळे यांनी इंडियन स्वच्छता लीगची माहिती देत ठाणे महापालिका ही रस्ते, गटारे, पावाटा, घनकचरा व्यवस्थापन यांपलिकडे जाऊन फिटनेसकडेही लक्ष देत आहे. सायकल बद्दल जनजागृती वाढत असल्याचे प्रतिपादन केले.

मुख्य स्वच्छता निरीक्षक मयुरी वखारिया, संस्थेच्या अध्यक्षा म्हात्रे, सेक्रेटरी दळवी, स्वच्छता विभागचे लक्ष्मण पुरी यांच्या हस्ते झेंडा दाखवून राईडला सुरूवात केली. प्रत्येक सहभागी सायकलप्रेमींना टी-शर्ट, मेडल आणि प्रमाणपत्र देण्यात आले. अजय नाईक यांनी सुत्रसंचालन केले.भारतीय नौदलाचे रिंकू सिंह हे सहकाऱ्यांसोबत या राईडमध्ये सहभागी झाले होते. यापूर्वी त्यांनी गेटवे ऑफ इंडिया ते इंडिया गेटपर्यंत सायकल राईड करुन बेटी बचाव बेटी पढाव चा संदेश दिला आहे.

# झाड पडल्याने ४५० ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत

**ठाणे:** वागळे इस्टेट, नेहरु नगर, रोड क्रमांक १६ या ठिकाणी एऑन एअरस्पेस प्लॉट मधील पायलट ट्रेनिंग सेंटरच्या नवीन इमारतीच्या कंट्रक्शन सुरू असलेल्या प्लॉटमधील एक झाड रोडवरती व महावितरणच्या विद्युत केबलवरती पडल्याची घटना सोमवारी सकाळी पावणे दहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

या घटनेत अमित पोपट पवार (३२) हा तरुण जखमी झाला आहे. तर त्या पडलेल्या झाडामुळे महावितरणचे केबल तुटल्या असून काही पोल ही पडल्याने नेहरू नगरमधील ४५० ग्राहकांचा विघुत पुरवठा खंडित झाला. या दुरुस्तीच्या कामाला ८ तास लागले. गणेशोत्सवाच्या कामात खोळंबा झाला.

वागळे इस्टेट येथे झाड पडल्याची माहिती मिळताच घटनास्थळी वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान या विभागांनी धाव घेतली. तसेच घटनास्थळी किरकोळ जखमी झाले अमित पवार यांना किसन नगर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तसेच पडलेले झाड वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने कापून बाजुला करण्यात आले आहे. झाड पडल्यामुळे नेहरू नगर, वागळे इस्टेट या परिसरातील सुमारे ४५० ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत झाला आहे. विद्युत केबलचे व पोलचे दुरुस्तीच्या कामाला सुमारे ०८-तासामध्ये पुर्ण करण्यात येईल असे, महावितरण कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३



www.diwanews.com

## झाड पडून दोन दुचाकींचे किरकोळ नुकसान

**ठाणे:** लोकमान्य नगर या ठिकाणी दैदिप्य सोसायटी समोर ठामपा स्ट्रीट लाईट पोलवर व रस्त्यावरती पार्क केलेल्या दोन दुचाकींवर झाड पडल्याची घटना रविवारी दुपारी पावणे एक ते एक वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी त्या दुचाकींचे किरकोळ नुकसान झाले. तसेच स्ट्रीट लाईट पोलही पडला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ठामपा विद्युत विभाग, आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल या विभागांच्या कर्मचाऱ्यांनी धाव घेतली.

दिवा स्टेशन प्रबंधक मनोज कुमार गुप्ता, आर पी एफ इन्स्पेक्टर गिरीश चंद्र तिवारी यांच्या माध्यमातून स्वच्छता अभियान आयोजन करण्यात आले.



## दिव्यातील घरगुती व सार्वजनिक गणेश मूर्ती



उत्तर भारतीय मंडळ.
हरी ओम डेरी,
बाजूला मुंब्रा देवी कॉलनी रोड दिवा



दिव्यातील समाजसेवक अशोक सोलंकी यांनी घरो घरी व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना भेट देऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.

## जमील शेख हत्येप्रकरणी आणखी एकाला अटक

**ठाणे :** येथील राबोडी परिसरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी जमील शेख यांच्या हत्येप्रकरणी ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखा युनिट एकच्या पथकाने राबोडीतील हबीब अजमईन शेख (३६) याला रविवारी अटक केली आहे. या प्रकरणात यापूर्वीच दोन आरोपींना अटक झालेली असून यातील ओसामा शेख हा फरार असून त्याच्या तपासादरम्यान शेख याचा सहभाग असल्याचे पुरक पुरावे मिळाल्यावर हबीब याला अटक केल्याची माहिती गुन्हे शाखा एक चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप पाटील यांनी दिली.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यालय आता व्हॉटसअॅप चॅनलवर!

**'ठाणे :** 'जनसामान्यांचे मुख्यमंत्री', अशी ओळख असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यातील जनतेशी आता थेट व्हॉटसअॅपद्वारे 'कनेक्ट' झाले आहेत. काल गणेश चतुर्थीच्या दिवशी मुख्यमंत्री सचिवालयाच्या 'सीएमओ महाराष्ट्र' या व्हॉटसअॅप चॅनेलचा श्री गणेशा करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी घेतलेले निर्णय, मंत्रिमंडळाचे निर्णय, शासनाच्या योजना, पाच विविध विकास प्रकल्प आदींची अचूक आणि अधिकृत माहिती या चॅनेलच्या माध्यमातून आता थेट जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

जगभरात संवादाचे प्रभावी व उपयुक्त माध्यम ठरलेल्या 'व्हॉटसअॅप'ने चॅनेलच्या माध्यमातून नवीन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला असून त्यावर मुख्यमंत्री सचिवालयाचे स्वतंत्र चॅनेल सुरु करण्यात आले आहे. प्रमाणित असलेल्या या चॅनेलला वापरकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून चॅनेल सुरु केल्यानंतर काही वेळेतच सुमारे ४० हजारांपेक्षा अधिक वापरकर्त्यांनी चॅनेलला फॉलो केले आहे.




मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ही अंमलबजावणी करताना शासनाच्या योजना तसेच निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहोचल्यास त्यांना त्याचा लाभ घेता येईल यासाठी लोकाभिमुख योजना, विकास प्रकल्पांची अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती, जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. 'हे सर्वसामान्यांचे सरकार' असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सदैव जनतेपर्यंत पोहोचण्यावर भर दिला आहे, आता हातातील स्मार्ट फोनवर थेट मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयांची, शासकीय योजनांची माहिती मिळत असल्याने हा संवाद अधिक प्रभावी होणार आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनसंपर्क कक्षामार्फत जनतेला माहिती देण्यासाठी सध्या एक्स (ट्विटर), फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, थ्रेडस, कू, टेलिग्राम आदी समाजमाध्यम तसेच इनस्टन्ट मेसेजिंग अॅपचा वापर केला जातो. व्हॉटसअॅपने गेल्या आठवड्यात चॅनेलची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्री सचिवालयाने कंपनीकडे संपर्क केला आणि 'CMO Maharashtra' या नावाने स्वतंत्र, प्रमाणित चॅनेलचा काल 'श्रीगणेशा' करण्यात आला आहे. या चॅनेलला वापरकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून काही तासांतच सुमारे ४० हजारांपेक्षा अधिक वापरकर्त्यांनी या चॅनेलचे अनुसरण केले आहे.

### चॅनेलला असे करा फॉलो

व्हॉटस अॅपवरील 'अपडेट्स' मेनूमध्ये गेल्यावर तिथे चॅनेल सेक्शन असून तिथे 'Find channels' मध्ये 'CMO Maharashtra' हे टाइप केल्यावर चॅनेलच्या यादीमध्ये हे प्रमाणित चॅनेल दिसेल, त्याला क्लिक करुन फॉलो केले की तुम्हाला सर्व अपडेट्स विनासायास उपलब्ध होणार आहेत. https:// whatsapp.com/ channel/0029Va4FQfl72WTydH1lnP3h या लिंकवर व्हॉटसअॅपधारकांनी क्लिक केल्यास 'CMO Maharashtra चॅनेलला फॉलो करता येणार आहे.

# केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी घेतले वर्षा निवासस्थानी गणरायाचे दर्शन

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सहकुटुंब शाह दाम्पत्याचे स्वागत



**मुंबई:** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सपत्निक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट देवून श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांचे गणेश मूर्ती शाल, श्रीफळ तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मुख्यमंत्र्यांच्या स्नुषा वृषाली शिंदे यांनी अमित शाह यांचे औक्षण केले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री दीपक केसरकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार मनोज कोटक, खासदार पूनम महाजन, आमदार आशिष शेलार उपस्थित होते.

# दिवा रेल्वे स्थानकाची वाटचाल अपघात शून्य स्थानकाकडे

## गेल्या महिन्याभरात एकही अपघात नाही

### खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

**ठाणे: सातत्याने रुळ ओलांडताना अपघात होत असल्याने दिवा रेल्वे स्थानकाचे नाव अधिक अपघात होणाऱ्या रेल्वे स्थानकांच्या यादीत येत होते. या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि नागरिकांनी रेल्वे फाटक ओलांडू नये यासाठी स्थानकाच्या पूर्व दिशेला कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांतून स्वयंचलित जिना बसविण्यात आला. त्यामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात घालून रेल्वे रुळ ओलांडणे बंद झाले असून गेल्या एक महिन्याच्या कालावधीत इथे एकही रेल्वे अपघाताची नोंद झालेली नाही. याबद्दल सर्वच स्तरातून आणि विशेषतः प्रवाशांकडून खासदार डॉ. शिंदे यांचे आभार मानले जात आहेत.**

मध्य रेल्वेवरील स्थानकांमध्ये ठाणे, डोंबिवली या स्थानकांबरोबरच दिवा स्थानक हे कायम गर्दीने गजबजलेल्या स्थानकांपैकी एक आहे. या स्थानकातून शहराच्या पूर्वेला जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. मात्र स्थानकाला शहराच्या पूर्व भागाला जोडणाऱ्या पुलावर केवळ दोनच अरुंद जिने असल्याने तिथे कायम चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थिती निर्माण होत असते. यामुळे बहुतेक प्रवासी थेट रेल्वे रुळ ओलांडून प्रवास करतात. त्यामुळे आतापर्यंत अनेक प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. २०२२ मध्ये रेल्वे रुळ ओलांडताना १७१ प्रवाशांना प्रवाशांनी प्राण गमावले आहेत. २०२३ मध्ये ऑगस्ट महिन्यापर्यंत

**स्थानकात सरकता जिना बसवल्याने प्रवाशांचे रेल्वे फाटक ओलांडणे बंद**

११० प्रवाशांनी दिवा रेल्वे स्थानकात झालेल्या अपघातांमध्ये आपला जीव गमावला आहे. केवळ जुलै महिन्यात २१ प्रवाशांचा दिवा रेल्वे स्थानकात वेगवेगळ्या अपघातात मृत्यू झाला आहे. अपघातांचे मुख्य कारण हे रेल्वे रुळ ओलांडून प्रवास करणे होते.

दिवा स्थानकात जाण्यासाठी आणि बाहेर पडण्यासाठी अपुरी व्यवस्था असल्यामुळे बहुतेक प्रवासी रेल्वे रूळ ओलांडण्याचा पर्याय निवडत होते. दिव्यातील ९० टक्के लोकसंख्या पूर्वेला राहत असूनही या दिशेला तिकिट खिडकी नव्हती. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांनी दिवा स्थानकात पूर्वेला पाहिले टिकिट घर उभारल्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले होते. त्यानंतर दिवा रेल्वे प्रवासी संघटनेच्या मागणीनुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिवा पूर्वेला सरकता जिना बसविण्याचे काम मार्गी लावले. गेल्या महिन्यात १६ ऑगस्टला या सरकत्या जिन्याचे लोकार्पण प्रवासी संघटना आणि शिवसेनेच्या वतीने करण्यात आले. यावेळी मध्य रेल्वे व्यवस्थापक रजनीश गोयल आणि इतर अधिकारीही उपस्थित होते. प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत दिवा रेल्वे फटकाची पाहणी करून सरकत्या जिन्याचं पर्याय उपलब्ध झाल्याने रेल्वे फाटक प्रवाशांच्या रहदारीसाठी पूर्णतः बंद करण्याचे निर्देश दिले.

१७ ऑगस्ट २०२३ पासून रेल्वे रूळ ओलांडणे पूर्णतः बंद झाल्यामुळे दिवा रेल्वे स्थानकात महिनाभरात रेल्वे रूळ ओलांडताना एकही अपघात झाला नाही. प्रवाशांना सरकत्या जिन्याचा पर्याय मिळाल्याने इतर अरुंद जिन्यांवरील गर्दीही कमी झाली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३

www.diwanews.com

## ठाण्यात मॅको बँकेची शाखा लवकरच स्वमालकीच्या जागेत

**ठाणे :** शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय बँक म्हणून प्रसिद्ध असलेली मंत्रालय अँड अलाईड ऑफिसेस को-ऑप (मॅको) बँकेची ठाणे शाखा लवकरच स्वतःच्या जागेत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयालगत स्थलांतरीत होणार आहे. या जागेची खरेदी नोंदणी सहनिबंधक कार्यालय, ठाणे येथे करण्यात आली. ही बँक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील बाजूस, कंपाउंड लगत, श्यामकमल को.ऑप. हाऊसिंग सो.लि., ऑफिस क्र.३ व ४, पहिला मजला, कडवा लेन, साईबाबा मंदिर जवळ, येथे लवकरच सुरू होणाक आहे.

# दिव्यातील घरगुती व सार्वजनिक गणेश मूर्ती


आदेश भगत यांच्या घरी विराजमान झालेले गणपती बाप्पा.गणरायाचे दर्शन घेताना आदेश भगत व त्यांचे कुटुंबीय


शैलेश पाटील यांच्या घरी विराजमान झालेले गणराय. गणरायाचे दर्शन घेताना माझी नगरसेवक शैलेश पाटील समाजसेवक कैलेश पाटील व त्यांचे कुटुंबीय.


दिवा आरपीएफ येथे विराजमान झालेलेबाप्पा


नवनाथ भगत यांच्या घरी विराजमान झालेले गणराय.


भालचंद्र भगत यांच्या घरी विराजमान गणराय


श्लोक नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ.


नवतरुण गणेश मित्र मंडळ. श्लोक नगर, दिवा.


दिवा विकास प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ येथे विराजमान झालेले गणपती बाप्पा

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३
पान : ६
www.diwanews.com

## ठाण्यात ओबीसी जनमोर्चाची निदर्शने

**ठाणे:** महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना करावी, मराठा समाजाला कुणबी समाजातून दाखले देऊ नये, मराठा समाजाला कलाम १०३ प्रमाणे इडब्लूएस मध्ये १० टक्के वाढ करून स्वतंत्र आरक्षण द्यावे व तसा केंद्र सरकारने कायदा करावा, अशा विविध मागण्यांसाठी सोमवारी ठाण्यात ओबीसी जनमोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी निर्दशने केली. यावेळी घोषणाही देण्यात आल्या .ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष दशरथ दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे निदर्शने करण्यात आले त्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

# दिव्यातील घरगुती व सार्वजनिक गणेश मूर्ती


विजय भोईर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराय.


सचिन पाटील साबेगाव


समीर नाकटे. सखाराम कॉम्प्लेक्स, शिवशक्ती नगर (दिवा).


गुरुनाथ पाटील साबेगाव


जय गणेश मित्र मंडळ. मुंब्रादेवी कॉलनीचा राजा


स्वाती भोईर, सखाराम कॉम्प्लेक्स बिल्डिंग लो प्राईज सुपर मार्केट बाजूला दिवा आगासन रोड दिवा.


कृष्णा रामचंद्र जाधव, गुरुदर्शन नगर, १८/१ मुंब्रादेवी कॉलनी रोड दिवा.


आई जीवदानी सोसायटी, मुंब्रादेवी कॉलनी.


सुनील लांजेकर, आई जीवदानी सोसायटी मुंब्रा देवी कॉलनी रोड दिवा

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३
पान : ७
www.diwanews.com

## धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत शासन सकारात्मक

**मुंबई :** शासन धनगर समाजाच्या पाठीशी असून आरक्षणाबाबत जी धनगर समाजाची भूमिका आहे,तीच शासनाची भूमिका आहे. धनगर आरक्षणाबाबत शासन सकारात्मक आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. धनगर समाज आरक्षणाबाबत आज सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, इतर मागास वर्ग आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आणि धनगर समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.


# दिव्यातील घरगुती व सार्वजनिक गणेश मूर्ती



सखाराम कॉम्प्लेक्स सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ. लो प्राईज सुपर मार्केटच्या बाजूला दिवा आगासन रोड (दिवा)



गणेश पाड्याचा राजा,( दिवा)



रमेश जाधव, हरिश्चंद्र अपार्टमेंट मुंब्रा देवी कॉलनी रोड दिवा (पूर्व)



सिद्धिविनायक मित्र मंडळ.



शिवसृष्टी मित्र मंडळ, बी .आर. नगर रोड दिवा (पूर्व)



श्री साई गणेश मित्र मंडळ, एस.एम.जी. स्कूल दिवा –आगासन रोड दिवा.



मुंब्रादेवी मित्र मंडळ. मार्केटचा महाराजा, विष्णू दादा आपारमेंट मुंब्रा देवी कॉलनी रोड दिवा



जय मल्हार सार्वजनिक मित्र मंडळ. गणेश नगर, आगासन रोड दिवा.



सुरेश दादा मित्र मंडळ. सुरेश नगरचा राजा, सुरेश नगर दिवा पूर्व.



दिव्याचा महाराजा. वक्रतुंड सार्वजनिक मित्र मंडळ, वक्रतुंड नगर, दिवा.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३
पान : ८
www.diwanews.com

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतले वर्षा निवासस्थानी गणरायाचे दर्शन

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सपत्निक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट देवून श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी श्री. शाह यांचे गणेश मूर्ती शाल, श्रीफळ तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मुख्यमंत्र्यांच्या स्नुषा सौ. वृषाली शिंदे यांनी श्री. शाह यांचे औक्षण केले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री दीपक केसरकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार मनोज कोटक, खासदार पूनम महाजन, आमदार आशिष शेलार हे उपस्थित होते.

## पाचव्या दिवशी गौरीगणपती विसर्जनासाठी कृत्रीम तलावांकडे भाविकांचा ओघ

### १५ टन निर्माल्य भाविकांनी केले दान

**ठाणे :** श्रीसह गौरी विसर्जनाच्या पाचव्या दिवशी ठाणे महापालिका क्षेत्रातील विसर्जनस्थळांवर एकूण १६८३० गणेश मूर्ती तसेच १००६ गौरी मूर्ती अशा एकूण १७८३६ मूर्तींचे महापालिकेच्या सुव्यवस्थित नियोजनामध्ये विसर्जन संपन्न झाले. त्यात १७१ सार्वजनिक मंडळाच्या गणेश मूर्तीही होत्या. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची परंपरा यशस्वीपणे राबविणा-या ठाणे महापालिकेच्यावतीने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रीम तलावांमध्ये यंदाही मोठ्या प्रमाणात भाविकांनी पाच दिवसांच्या गणेश मूर्तींचे व गौरी मूर्तींचे विसर्जन केले.

महापालिकेने तयार केलेल्या विसर्जन व्यवस्थेला ठाणेकर नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार मानले आहेत. प्रत्यक्ष विसर्जनाच्या ठिकाणी महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह अतिरीक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरीक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनी पाहणी केली. तसेच, गणेश भक्तांचे सहकार्याबद्दल आभारही मानले.

**भाविकांनी ४४८ मूर्ती स्वीकार केंद्रात दिल्या**

महापालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या गणेश मूर्ती स्वीकार केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण ४४८ गणेश मूर्तींचे महापालिकेच्यावतीने पारसिक रेतीबंदर घाट येथे विधिवत विसर्जन करण्यात आले.

**१५ टनाहून अधिक निर्माल्य भक्तांनी केले दान**

ठाणे महानगरपालिका आणि समर्थ भारत व्यासपीठ गेली १२ वर्षे गणेशोत्सव काळातील निर्माल्य व्यवस्थापन करीत आहे. त्यात रोटरी क्लब ऑफ ठाणे गार्डन सिटी तसेच प्रकल्प पुर्ननिर्माणचे सदस्य मदत करतात. पाच दिवसाच्या गणेश मूर्ती व गौरी मूर्ती विसर्जनादरम्यान सुमारे १५ टनाहून अधिक निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे. दीड दिवसाच्या गणेश मूर्ती विसर्जनावेळी सुमारे १० टन निर्माल्य संकलन झाले होते. विशेष म्हणजे प्लास्टिकचे प्रमाण अतिशय कमी झाले आहे.

**विर्सजनाची आकडेवारी**

| विर्सजन स्थळ (संख्या) | – | गणेश मूर्तींची संख्या |
|---|---|---|
| कृत्रिम तलाव (१५) | – | ११५३६ |
| विसर्जन घाट (०७) | – | ४७९३ |
| विशेष टाकी व्यवस्था (४२) | – | १५०७ |
| एकूण | – | १७८३६ |
| एकूण गणेश मूर्ती | – | १६८३० |
| एकूण गौरी मूर्ती | – | १००६ |
| सार्वजनिक गणेश मूर्ती | – | १७१ |
| मूर्ती स्वीकार केंद्र | – | ४४८ |

## दिव्यातील घरगुती व सार्वजनिक गणेश मूर्ती



श्री साईनाथ मित्र मंडळ.
सिद्धिविनायक गेट जवळ दिवा आगासन रोड दिवा



शिवतेज मित्र मंडळ.
विकास म्हात्रे गेटच्या बाजूला (दिवा)



भोलेनाथ रामकृष्ण पाटील.
विघ्नहर्ता बंगला साबेगाव दिवा.



समीर नाकटे. सखाराम कॉम्प्लेक्स,
शिवशक्ती नगर ( दिवा)